दिवाणी दावा क्र.२१३/२०१२
सुर्यकांत– वि– प्रकाश
नि.क्र.४१ वर

**वादीचा पुढील सरतपास वकील श्री.एस.डब्लू. तिजारे यांचेमार्फत शपथेवर सुरू:–**

आता मला माझे वडिलांचे आवाजाची चित्रफित (सि.डी.) दाखविण्यात आली. त्यामध्ये माझे वडिल माझया पत्नीशी, राजू उईके व माझा मोठा मुलगा व माझे साळीचा मुलगा यांचे मुलाशी वादशेतीसंबंधी बोलतांना दिसले. त्यातील मजकुर बरोबर व खरा आहे. **(प्रतिवादी क.३ ते ५ करिता श्री. पिंपळकर यांनी वरील सिडीला निशाणी देण्यास उजर घेतला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दुयम पुरावा दाखल करण्याकरिता परवानगी घेण्यात आली नाही. तसेच तांत्रिक निष्णांत व्यक्तीला भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब चे प्रमाणपत्र सिध्द करण्याकरिता तपासले नाही त्यामुळे मजकुर सिध्द न झाल्याने त्यातील मजकुर सिध्द झाला नाही त्यामुळे त्याला निशाणी देता येणार नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार रेकॉर्डवर दाखल केलेली सिडी काढून दुसरी सिडी दिली. ती सिडी वाजविल्यानंतर असे लक्षात येते की, बोलणा–या व्यक्तीला धोक्यात ठेवून चित्रफित घेण्यात आली आहे. मुळात बोलणारी व्यक्ती ही वादीचे वडिलच होते काय हे सुध्दा सिध्द झाले नाही व त्यांच्या पाठीमागून चित्रफित रेकॉर्ड करण्यात आली आहे. तसेच स्वमर्जीने ते रेकॉर्ड करण्यात आले नाही व त्या व्यक्तीची स्वत:ची इच्छा नसतांना ते रेकॉर्ड करण्यात आली आहे. तसेच आजूबाजूच्या व्यक्तीच्या दबावाखाली ते रेकॉर्ड करण्यात आले. तसेच त्यांना प्रलोभन देण्यात आले होते. तसेच त्यांची विधान स्पष्ट नाहीत. त्यांची मानसिक व शारीरीक स्थिती चांगली दिसत नाही. व्हिडीओ हा ब्लर होता, त्यामुळे टॅम्पर केलेला आहे. तसेच त्यांचे बयान हे**

विसंगत करता येत नाही कारण बोलणारी व्यक्ती मरण पावली आहे. तसेच तो व्हिडीओ कोणी रेकॉर्ड केला, हे कळत नाही. त्यामुळे या साक्षीदाराला सिध्द करण्याचा अधिकार नाही. तसेच त्या व्यक्तीला तुझे बोलणे रेकॉर्ड केला जात आहे, याची कल्पना दिली नव्हती. तसेच ही पुराव्याकामी उपयोगात आणल्या जाईल, हे सांगितले नाही. तसेच कोणत्या तारखेला रेर्कार्ड केले, हे कळत नाही. त्यामुळे सदर सिडीला निशाणी देण्यात येवू नये. ........याउलट वादीचे वकील श्री. तिजारे यांनी असे म्हटले की, सिडी ही वाजली नाही कारण तो तांत्रिक बिघाडाचा भाग आहे. तो व्यक्ती दवाबामध्ये होता, ही बाबसुध्दा सिद्ध करण्यात आली नाही. ज्या व्यक्तीने सिडी रेकॉर्ड केली त्याचे नाव प्रमाणपत्रामध्ये दिले आहे. व्हिडिओ व ध्वनीफित हे स्पष्ट आहे त्यामध्ये ब्लर नाही. ही चित्रफित बक्षिसपत्र व मृत्युपत्राच्या संबंधाने संशयीत परिस्थितीसंबंधाने आहे. बक्षिसपत्र व मृत्युपत्र हे २००८ मध्ये करण्यात आले आणि २००९ मध्ये हे चित्रफित तयार करण्यात आली. प्रस्तुत प्रकरण हे तांत्रिक बाबींविषयी नाही तसेच पोलीसांनी सुध्दा ही चित्रफित घेतली नाही, ही चित्रफित खाजगी व्यक्तीने घेतली आहे. तसेच उलट तपास करण्याची संधी इतर पक्षाला आहे. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकूण घेतला. या केसमध्ये वादीला त्याच्या वडिलांचे संभाषणाची चित्रफित निशाणी देण्यात कोर्टाला विनंती केली आहे. वादीने स्वत: चित्रफित रेकॉर्ड केली नाही, याबद्दल कुठेही दुमत नाही. चित्रफित ही इतर व्यक्तीने रेर्कॉर्ड केली आहे. भारतीय पुरावा कायदा कलम ३ प्रमाणे चित्रफित ही दस्त या सदरामध्ये मोडते. तसेच भारतीय परावा कायदयाचे कलम ६३ व ६५ प्रमाणे चित्रफित ही खाजगी दस्त म्हणता येईल कारण तो सरकारी कार्यालयामधून किंवा सरकारी कर्मचा-याच्या माध्यामातून चित्रफित करण्यात आलेला नाही.

**त्यामुळे माझे मते वरील दस्त हा खाजगी दस्त असल्याने ज्या व्यक्तीने तो तयार केला त्याच्या मार्फत तपासून वादी तो दस्त सिध्द करू शकतो. त्यामुळे माझे मते त्या सिडीला ओळखीकरिता तातपुरत्या स्वरूपात निशाणी देण्यात येत आहे. )** त्याला **नि.७०** देण्यात येते.

आता मला दि.२३.०९.२००९ रोजी व्हिडीओ कॅसेट नि.७० मधील संभाषणाचे लेखी दस्त तयार केलेले मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. त्याला **नि.७१** देण्यात येते.

**प्रतिवादी क. ३ ते ५ कडून वकील श्री. पिंपळकर हजर. श्री. पिंपळकर यांचे विनंतीवरून केस वादीचे उलटतपासाकरिता ठेवण्यात येते.**

वा.दा.ब.अ.क.केले. समक्ष,

दि.न्या क.स्तर.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
उमरेड.
दि.०१.०१.२०२१